जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUL 2021

पुढारी

एम.फिल., प्री.पीएच.डी कोर्सवर्क परीक्षा १० ऑगस्टपासून सुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा: शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २०२०-२१ मधील मार्च-एप्रिल २०२१ उन्हाळी सत्रातील परीक्षा १० ऑगस्टपासून सुरू होणार आहेत. त्यानुसार एम.फिल., प्री. पीएच.डी कोर्सवर्क परीक्षा महाविद्यालय, अधिविभागस्तरावर ऑनलाईन पद्धतीने घेतल्या जाणार आहेत.

परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने होणार आहेत. प्रश्नपत्रिकेचे स्वरुप यापूर्वी निश्चित केल्याप्रमाणे असेल. परीक्षेचे संचलन, पर्यवेक्षणाची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिविभागप्रमुख यांच्यावर असणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUL 2021

सकाळ

टेंबलाईवाडी : 'आम्ही जगाचे कैवारी' पुस्तकाच्या प्रकाशनावेळी इंद्रजित देशमुख, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रणधीर शिंदे, युवराज कदम आदी.

'आम्ही जगाचे कैवारी' पुस्तकाचे प्रकाशन

उजळाईवाडी : ग्रामीण साहित्याचा बाजच वेगळा आहे. सकस साहित्यातूनच सामाजिक परिवर्तन घडते, असे मत संत साहित्याचे अभ्यासक व माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी व्यक्त केले. वाचनकट्टा निर्मित व विजय पाटीललिखित 'आम्ही जगाचे कैवारी' या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के, मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे प्रमुख उपस्थित होते. ग्रामीण भागातील लेखकांच्या लेखणीमधून निर्मित होणारे साहित्य समाजाला दिशा देणारे असून जे घडलं, जे सोसलं, त्याचे प्रतिबिंब विजय पाटीललिखित 'आम्ही जगाचे कैवारी' या पुस्तकात स्पष्टपणे उमटले असल्याचेही देशमुख म्हणाले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनीही पुस्तकावर विविधांगी विश्लेषण केले. वाचनकट्ट्याचे संकल्पक युवराज कदम यांनी प्रास्ताविक केले. माजी मुख्याध्यापक बी. डी. कुंभार यांनी आभार मानले. सदिच्छा फाउंडेशनचे सुहास रोमाने, कौस्तुब यादव, सचिन मुळे, विष्णू पावले, संजय पाटील, आनंद पाटील आदी उपस्थित होते.